प्रस्थापित केले आहे. पेनग्रिप, उत्कृष्ट पदलालित्य, रॉपस्पिनची अदाकारी यामुळे या खेळाडूंचे कौशल्य काही औरच आहे. आपल्या देशातील खेळाडूही या खेळात मागे नाहीत, परंतु आंतरराष्ट्रीय स्तरावर मात्र आपले खेळाडू फारशी उत्साहकारक कामगिरी करू शकले नाहीत. काही खेळाडूंनी राष्ट्रीय स्तरावर मात्र उत्कृष्ट प्रगती दाखवली आहे. खेळात नवोदित खेळाडूंची संख्या मोठ्या प्रमाणात आढळून येते. त्यातच गायत्री भागवतची गणना होऊ शकते.

मिझोराम येथे झालेल्या राष्ट्रीय टेबल टेनिस स्पर्धेतून आंतरराष्ट्रीय सराव



गायत्री भागवत

येतात. तोच एकमेव क्लब असल्याने मोठी गर्दी होते. सरावासाठी फारच थोडा वेळ मिळतो. इतर ठिकाणच्या खेळाडूंची तयारी, मिळणाऱ्या सुविधा, प्रशिक्षण याची तुलना करता कोल्हापुरातील 'डिस्ट्रिक्ट स्पोर्टस् असोसिएशन'ने याकडे लक्ष देण्याची गरज आहे, असे गायत्रीला वाटते. मिझोरामला जाताना वाटेतच एक हजार रुपये कमी पडले. वाटेतूनच परत याव लागते की काय अशी परिस्थिती निर्माण झाली होती. ऐनवेळी पिराजीराव घाटगे ट्रस्टने तिला मदत केली.

गायत्री केवळ टेबल टेनिस खेळाडू

दैनिक सकाळ दि. २१ फेब्रुवारी १९९२

# उगवती टेबल टेनिसपटू : गायत्री भागवत

शिबिरासाठी गायत्री भागवतची निवड झाली. दिल्लीत होणाऱ्या या शिबिरातूनच आंतरराष्ट्रीय संघाची निवड होईल. कोल्हापुरातील कमला कॉलेजमध्ये शिकणाऱ्या गायत्रीची वाटचाल आता आंतरराष्ट्रीय स्पर्धेच्या दिशेने चालू झाली आहे. मिझोराम येथील राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राच्या संघाचे नेतृत्व तिच्याकडेच होते. सांघिक कामगिरीत राज्यसंघ मागे पडला, पण गायत्रीच्या वैयक्तिक कामगिरीचा विचार होऊन सराव शिबिरासाठी तिची निवड करण्यात आली. १९ वर्षांखालील गटामध्ये निवड झालेली महाराष्ट्रातील ती एकमेव खेळाडू ठरली आहे. गायत्रीची यशाच्या शिखराकडे आता कुठे वाटचाल सुरू झाली आहे.

गायत्री ताराराणी विद्यापीठाची विद्यार्थिनी. इयत्ता पाचवीत असल्यापासून ती टेबल टेनिस खेळू लागली. शाळेतील वातावरण या खेळाला पूरक होते. आई प्रभादेवी भागवत आणि शाळेतील शिक्षक टेंगशे सर यांनी तिच्यातील गुणांचा विकास केला. मात्र तिच्या आयुष्यात टेबल टेनिसमध्ये वळण देणारी एक घटना ठरली. चार वर्षांपूर्वी शिवाजी विद्यापीठात टेबल टेनिस प्रशिक्षणाचे एक शिबीर झाले. तिथे मार्गदर्शनासाठी पतियाळाचे प्रशिक्षक आले होते. या शिबिरात गायत्रीला पहिल्यांदा टेबल टेनिसमधील आधुनिक तंत्राचे ज्ञान झाले.

**जयसिंग पाटील**

आतापर्यंत चार वेळा शालेय आणि दोन वेळा खुल्या राष्ट्रीय स्पर्धेतून तिने भाग घेतला. पहिल्यांदा तिच्या खेळात नवखेपणा होता. समोरचे स्पर्धक अधिक तयारीचे होते. त्यांचे खेळ बघून गायत्री आपल्या खेळाच्या तंत्रात सुधारणा करीत गेली. 'वॉच अॅन्ड इंप्रूव्ह' या तत्त्वानेच आपण खेळाचा विकास केल्याचे ती आवर्जून नमूद करते.

नाही. गायनातील मध्यमाची परीक्षा ती उत्तीर्ण झाली आहे. शास्त्रीय नृत्य शिकलेली आहे. चित्रकलेची परीक्षा दिलेली असून ती स्वतः पेंटिंग करते. इतकेच नव्हे तर वक्तृत्व, कथाकथन स्पर्धांतून तिने अनेक बक्षिसे मिळवली आहेत. असं असलं तरी टेबल टेनिस हेच तिचं महत्त्वाचं कार्यक्षेत्र आहे. एवढं सगळं सांभाळून शालेय अभ्यासातही कुठं मागं पडू नये याची ती दक्षता घेत असते.

**संपूर्ण नाव :** गायत्री अरुण भागवत.

**पत्ता :** १०८६, ई वॉर्ड, राजाराम रोड, कोल्हापूर.

**शिक्षण :** बारावी कॉमर्स, कमला कॉलेज कोल्हापूर.

**कर्तृत्व :** ज्युनिअर गटातील टेबल टेनिसच्या राज्य संघाची कर्णधार, पाच वेळा राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेतून सहभाग, कोल्हापूर गौरव समिती आणि उत्स्फूर्त समूह पुरस्कार.



गायत्री भागवत

# आंतरराष्ट्रीय शिबिरासाठी गायत्री भागवतची निवड

कोल्हापूर, ता. १४- मिझोराम येथे झालेल्या राष्ट्रीय शालेय टेबल टेनिस स्पर्धेतून आंतरराष्ट्रीय स्पर्धेच्या सराव शिबिरासाठी येथील कमला कॉलेजच्या गायत्री भागवत हिची निवड झाली आहे. तिने मिझोराम येथे झालेल्या स्पर्धेत महाराष्ट्र शालेय संघाचे कर्णधारपद भूषविले होते.

दैनिक पुढारी
१४ फेब्रुवारी १९९२